Vol 6 Issue 2 August 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**


Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

GRT Golden Research Thoughts

# महिलांचे राजकीय सामाजिकरण व सक्षमीकरणावर प्रकाशित साहित्याची समिक्षा व आशय विश्लेषणाचा अभ्यास (विशेष संदर्भ– आदिवासी महिला)

प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे[1] , प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे[2]
[1]राज्यशास्त्र विभागए गंगामाई एज्युकेशन संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगांव. ता.जि. धुळे.
[2]राज्यशास्त्र विभाग, जयहिंद एज्युकेशन ट्रस्टचे झुलाल भिलाजीराव पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धुळे.. ता.जि. धुळे.



**सारांश–**

सध्याच्या युगात ग्रंथ आणि ग्रंथालयाची उपयुक्तता वाढत आहे. ग्रंथ हेच शिक्षणाचा पाया असल्यामुळे अध्ययन आणि अध्यापन कार्यक्षमरित्या होण्यासाठी समृध्द ग्रंथ, ग्रंथालयाची आवश्यकता असते. अत्यंत दुर्मिळ आणि नवीन पुस्तके उपलब्ध झाली तर संशोधन कार्याला गती मिळते म्हणून संशोधकाला विश्लेषण करणे अत्यंत सोपे जात असते. कारण संशोधक हा आपल्या विषयाच्या संदर्भातील सर्व उपलब्ध कागदपत्राचा शोध व संदर्भतपासणी पुस्तकातुनच करत असतो. म्हणून संशोधन सुरू करतांना ग्रंथ आणि ग्रंथालयाची आवश्यकता असते. तसेच ग्रंथाच्या समिक्षेची आशय विश्लेषणाची गरज असते

**प्रस्तावना–**

भारताने लोकशाही शासन व्यवस्था स्विकारली. लोकशाही म्हणजे श्लोकांनी लोकांसाठी लोकांव्दारे चालवलेले शासनश होय. भारतीय लोकशाहीने सर्व भारतीयांना समान अधिकार , हक्क प्रदान केले. भारतीय घटनेनेदेखील शासन व्यवस्थेचे परीचलन करतांना लिंगभेद करणार नाही याची हमी दिली आहे. त्यामुळे स्त्री.पुरूषांची समानता आम्ही मान्य केली. तरीदेखील महिलांच्या राजकीय सबलीकरण व सामाजिकरणाचा प्रश्न सुटत नाही. कारण आजही अन्याय , अत्याचार , शोषण या कारणांनी महिलांचे जीवन अत्यंत दुखःद झाले आहे असे दिसून येते

अनेक संशोधकांनी , अभ्यासकांनी विविध प्रकारच्या साहित्याच्या निर्मितीच्या माध्यमातुन स्त्रीयांचे प्रश्न समाज व शासनासमोर मांडले त्यामुळे मागील काही वर्षात महिलांवर ज्या योजना कार्यक्रम साहित्य प्रकाशित झाले त्या साहित्याचा अभ्यास करणे प्रत्येक संशोधकाला आवश्यक असते कारण प्रकाशित साहित्य हे संशोधनाची दिशा दाखवत असतात. प्रकाशित साहित्यातुनच निरिक्षण, परीक्षण , मुल्यमापन आणि शेवटी निष्कर्ष निघत असल्याने प्रकाशित साहित्याची समीक्षा विश्लेषण आणि मूल्यन या दोन्ही प्रक्रीया केंद्रस्थानी असल्याने.[1] त्याचे संशोधकाने प्रकाशित साहित्याची समीक्षा व आशय विश्लेषण करणे सामाजिक शास्त्राच्या अभ्यासासाठी आवश्यक असते.

कोणतेही "संशोधन सुरू करतांना प्राथमिक अवस्थेत ग्रंथ व ग्रंथालयाची आवश्यकता असते"[2]

कारण ग्रंथ हे संशोधनाचा मुलभत पाया भरणी करत असतात आणि विषयाला शास्त्रीय रूप प्रदान करण्यात महत्वाची भूमिका बजावतात "ज्यात परिक्षण,सत्यापन,व्याख्या, वर्गीकरण, संघटन आणि निर्धारण आणि भविष्यकथन"[3] सारखे घटकांचे विश्लेषण करणे सोपे जाते.

प्रस्तुत साहित्य समिक्षा व आशय विश्लेषण मी करत असलेल्या आदिवासी महिलांच्या राजकीय सामाजिकरणाचा विश्लेषणात्मक अभ्यास (विशेष संदर्भ –धुळे जिल्हा) या संशोधन कार्याशी संबंधित आहे. आणि विशेष म्हणजे धुळे जिल्हयातील आदिवासी महिलांचा विशेष संदर्भ असल्यामुळे या साहित्य समिक्षेला व आशय विश्लेणाला अन्योन्य साधारण महत्व आहे.

- **उद्देश** – 1) प्रकाशित साहित्य समिक्षा व आशय विश्लेषणातून महिलांच्या राजकीय आणि सामाजिक सशक्तीकरण प्रक्रीयेचा चिकित्सक अभ्यास करणे.
- **महत्व** – प्रकाशित साहित्याची समिक्षा आशय विश्लेषण तटस्थ वृत्तीने केली असता साहित्यातुन उपलब्ध होणा–या व संदर्भांमुळे संशोधनाला चालना मिळत असते व संशोधनाची गुंतागुंत दूर होवून अंतिम निष्कर्षापर्यंत पोहचता येते म्हणून संशोधनासाठी प्रकाशित साहित्याची समिक्षा व आशय विश्लेषण केल्याने संशोधनाचे समाजउपयोगी मूल्य वाढून त्याला महत्व प्राप्त होते.
- **मुख्यशब्द** – भारतीय संविधान , महिला कायदे, मानवाधिकार , पंचायतराज, महिला नेतृत्व, दलित व आदिवासींचे हक्क , चळवळी , महिला आरक्षण , संघटना , दलित व आदिवासींचे शोषण , महिला आयोग, मानवाधिकार आयोग.
- **संशोधन पध्दती** – प्रस्तुत समीक्षा व आशय विश्लेषणासाठी सामाजिक शास्त्रे संशोधनाची विश्लेषणात्मक पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.
- **गृहितक** – 1) प्रकाशित सर्व साहित्य हे महिलांचा सर्वांगिण कल्याण व हित साधणे हे ध्येय व उद्दिष्ट

समोर ठेवून प्रकाशित केले आहे.

2) प्रस्तुत साहित्यातून महिलांच्या आणि विशेष म्हणजे आदिवासी महिलांच्या सामाजिक, अर्थिक, राजकीय सामाजिकरणाला व सक्षमीकरणाला प्रोत्साहन व बळ मिळते.

• विश्लेषण –

गोरे गोविंद – ***आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ*** , सुगावा प्रकाशन, पुणे, जुलै–2000

(ISBN – 81-86182-58-6 )

आदिवासींच्या सर्वांगीण वैज्ञानिक पातळीवर अभ्यास करणारे डॉ. गोविंद गोरे हे महाराष्ट्रातील अग्रगण्य लेखक , त्यांनी वरील पुस्तकात वैज्ञानिक लेख स्वरूपांत लिहून आदिवासींच्या समस्या व आधुनिक काळात आदिवासींचे निर्माण झालेले प्रश्न व त्यावरील उपाय यांवर विशेष लिखाण केले आहे. आदिवासींचा कायदा , धर्म , जात, शिक्षण , विवाह , कुपोषण व बालमृत्यू , वनजमिनी , जातीप्रमाणपत्र , आदिवासी मजूर समस्या , सामाजिक राजकीय , मानसिक जडणघडण  या सर्व विषयांची सखोल चिकित्सा केली आहे. त्यामुळे या पुस्तकातून आधुनिक काळात आदिवासींच्या समस्या कशा सोडवायच्या याचे प्रमुख मार्गदर्शन या पुस्तकातून मिळते.

आवारी विलास ,देवरे सुरेश – ***राजकीय समाजशास्त्र*** ,डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे, आवृत्ती –1,

जुन, 2014. (ISBN – 978-81-8483-584-7)

या पुस्तकात लेखकाने समाजाची राज्यशास्त्र अभ्यासाची भूमिका राजकीय समाजशास्त्राचे  उद्दिष्ट व त्याचा समाजमनावर होणारा परिणाम तसेच त्यांची सामाजिक, अर्थिक, राजकीय धार्मिक सांस्कृतिक क्षेत्रात असणारी महत्वाची भूमिका यावर गहण तुलनात्मक आणि विश्लेषणात्मक चर्चा केली आहे. यांत त्यांनी राजकीय सामाजिकरणाबरोबरच , राजकीय संस्कृती , राजकीय विचारप्रणाली , राजकीय सहभाग , सत्ता , अधिकार , अधिमान्यता , राजकीय परिवर्तन व विकास याची देखील राजकीय सामाजिकरणाच्या दृष्टीकोनातून गहण चर्चा केली आहे. त्यामुळे राजकीय सामाजिकरणाचा अभ्यास करणा–या अभ्यासकांना राजकीय सामाजिकरणाचा मुलभूत पाया अभ्यासणे सोपे जाते हे पुस्तकाच्या विशेषत्वातून समजते.

कुलकर्णी पी.के. – ***दलितांचे आणि आदिवासींचे समाजषास्त्र*** – डायमंड पब्लिकेशन्स, पुणे,

आवृत्ती कं. 1,  2012, (ISBN-978-81-8483-452-9)

हे पुस्तक दलित व अदिवासींच्या सर्व अंगांचा वैज्ञानिक व चिकित्सक  पातळीवर अभ्यास करणारे तसेच त्यांच्यावर होणा–या अन्याय , अत्याचार , शोषण याची साख्यिंकीय तुलनात्मक आकडेवारी मांडणा–या शोंधाचा संच आहे. या पुस्तकात त्यांनी दलित आदिवासी विषयी जे गैरसमज उच्चवर्णीयात आहेत हा गैरसमज अभ्यासातुन नव्हे तर पूर्वग्रहांतून निर्माण झाला आहे हे सिध्द करून दाखवले या पुस्तकात लेखकाने दलित अदिवासींना आजही कोणकोणत्या विजातीय परिस्थितीचा सामना करावा लागतो त्याच्यावर आजही कसे अत्याचार अन्याय होतात याचे स्पष्ट प्रतिपादन या पुस्तकातून लेखकाने केले आहे त्यामुळे सदर पुस्तक सामाजिक प्रबोधनाचा मानबिंदू ठरते.

रानडे प्रतिभा – ***स्त्री प्रष्नांची चर्चा*** : एकोणिसावे शतक, पदयगंधा प्रकाशन, पुणे, आवृत्ती–2.

मार्च 2005

मुळात स्त्रीयांचा सर्वांगी अभ्यास या पुस्तकातुन लेखिकेने वैज्ञानिक पातळीवर केला आहे. आज स्त्रीवादी चळवळ मोठया प्रमाणात जगात सुरू झाली आहे. या चळवळीला निरनिराळे धुमारे देखील फुटले आहे. जागतिकीकरण, उदार आर्थिक धोरण , पाणी टंचाई , समाजामध्ये विशेषःत स्त्रियांच्या बाबतीतला वाढता असंतोष , लैगिंक शोषण , आणि हिंसा वैदयकिय क्षेत्रातील विकास, जेनेटिक्स सायन्स इ. मुळे स्त्रियांपुढे नव्या समस्या उभ्या आहेत. या आव्हानांना स्त्रियांनी आणि विशेष दलित अदिवासी स्त्रियांनी कसे पुढे जावे यांचे विवेचन या पुस्तकातून लेखिकेने करून स्त्री प्रबोधनाचा नवा मार्ग मोकळा केला आहे.

देवगावकर . एस.जी. – ***महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती*** , श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,

प्रकाशन कं. 139 , आवृत्ती– 1 डिसेंबर 2009

महाराष्ट्रात ज्या विविध जाती जमाती आहेत त्यांचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत महत्वाचे पुस्तक आहे. सरकारव्दारे सध्या जाती जमातींना आरक्षण देण्याला प्राधान्य आहे. जाती जमातींना दाखले देणे, काही समुहांच्या मागण्या समोर आल्यास त्यांचे मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करून जाती जमातींचे सामाजिक संदर्भात नेमके स्थान ठरविणे यासाठी अभ्यास करावा लागतो. आरक्षणा संदर्भाचे विविध आयोग , शासकीय समित्या या सगळयांच्या उणीवा भासू नये हा दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून वरील सर्व विषयांची चर्चा या पुस्तकात करण्यात आली आहे. प्रस्तुत पुस्तकांत जात,पोटजात, वास्तव्य, जिल्हे, वैवाहिक संबंध, व्यवसाय, जीवनचक्रातील विविध , आजची स्थिती, आणि शेवटी आरक्षण आवश्यकता आरक्षणाची तरतुद, संविधांची कायदयांची यंत्रणा, आरक्षित जाती जमातींच्या आरक्षणाची सूचि यांत दिल्यामुळे संशोधकांना या पुस्तकाचा संशोधनासाठी व जातीजमातींना कायदयांच्या अर्थ लावण्यासाठी फायदा होतो. संशोधक अभ्यासू व्यक्तीसाठी हे पुस्तक म्हणजे अनमोल ठेवा आहे.

वाडकर प्रभावती – ***महाराष्ट्र शासनाचे महिलाविषयक धोरण*** ( एक चिकित्सक अभ्यास),

अक्षरलेख प्रकाशन, सोलापूर , आवृत्ती– 1 नोव्हेंबर 2010 (ISBN -978-93-81528-05-1)

महिला धोरणाचा सांगोपांग व सर्वांगीण विचार करणारा ग्रंथ आहे. महाराष्ट्र राज्याने माहितीविषयक धोरणाची जी पुरोगामी भूमिका

स्वीकारली आहे त्यानुसार कल्याणकारी राज्यव्यवस्थेत महिलांची आधुनिक व्यवस्थेत कशा प्रकारची भूमिका असेल याचे सविस्तर विवेचन या पुस्तकात करण्यात आले आहे. त्याचबरोबर महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरण 2001 हे केंद्र सरकारने जाहिर केल्यानंतर पुरोगामी महाराष्ट्र राज्याने सर्व प्रथम 1994 मध्ये स्वतंत्र अशा महिला धोरणाची निर्मिती केली. व त्यानंतर मागील धोरणाचा आढावा घेउन 2001 मध्ये सुधारीत नवीन महिला धोरण जाहीर केले त्या सर्व धोरणांची चर्चा लेखिकेने या पुस्तकामध्ये केली आहे. त्यामुळे हे पुस्तक म्हणजे शासनाच्या महिला धोरणाचा अभ्यास करणारे श्रेष्ठ पुस्तक आहे.

***भारताचे संविधान (94 व्या सुधारणेपर्यंत अदयावत)*** – भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय –
भारत सरकार, आवृत्ती – 6 वी, महाराष्ट्र राज्याव्दारे प्रकाशित 2011 ( 12 जुन 2006 पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे)

भारत सरकारच्या वतीने महाराष्ट्र शासनाने प्रकाशित भारताचे संविधान (94 व्या सुधारणेपर्यंत अदयावत– (12 जुन 2006 पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे) भारतीय नागरिकांना संविधानामध्ये कोणकोणत्या प्रकारचे मुलभूत अधिकार व हक्क दिलेले आहेत तसेच भारतांचे संपुर्ण सामाजिक, अर्थिक , राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्र कोणत्या कायदे आणि कलमाव्दारे चालेल याचे सविस्तर विवेचन यामध्ये सांगण्यात आलेले आहे त्यामुळे आदिवासी महिलांचे राजकीय सामाजिकरण अभ्यासतांना आदिवासींबाबत संविधानात असलेल्या कायदेशीर व संविधानिक बाबींचा अभ्यास व अर्थ लावणे या पुस्तकामुळे सोपे जाते त्यामुळे सदर पुस्तक संशोधनासाठी महत्वपूर्ण आहे.

देवगांवकर एस. जी., एस.जी. शैलजा, डुमरे जयमाला – ***सामाजिक चळवळी ( परंपरांगत आणि नवीन )*** , साईनाथ प्रकाशन नागपूर, आवृत्ती–1, नोव्हेंबर 2009, प्रकाशन क्रं. 136, (ISBN -978-93-80287-04-1)

भारतात व महाराष्ट्रात परंपरांगत आणि नवीन काळात ज्या विविध चळवळी झाल्या आहेत त्यांचे सविस्तर विवेचन लेखकाने या पुस्तकामध्ये केले आहे. कोणतीही चळवळ असो ती राजकारण व्यवस्था निर्मितीची फलीत असते. त्यामुळे आजच्या शासन व्यवस्थेत जे निर्णय घ्यावे लागतात ते सर्व निर्णय या चळवळीचा अभ्यास करून घ्यावे लागतात आणि शासनकर्ते देखील नियोजन, कार्यक्रम योजना ठरवितांना चळवळीतून आलेल्या मागण्यांचाच विचार करून त्यांचे कायदे कलमे, योजनेमध्ये निर्मिती करतात. त्यामुळे लेखकांने या पुस्तकात आदिवासी, कामगार, शेतकरी, दलित, विद्यार्थी, स्त्रिया, वंश, नक्षल, आरक्षण व इतर राष्ट्रीय चळवळीचा तौलनिक व चिकित्सक अभ्यास या पुस्तकात मांडून समाज परिवर्तनाची महत्वाची भूमिका यांत बजावली आहे.

पटले भरतसिंग अमरसिंग – ***परिवर्तनीय आदिवासी पावरा समाज*** – अथर्व पब्लिकेशन, जळगांव, आवृत्ती–1, जुन 2013, (ISBN -978-93-82795-48-3)

आदिवासी पावरा समाज हा खान्देशचा उत्तर भागातील नुदंरबार, धुळे, जळगांव जिल्हयात तसेच मध्यप्रदेशातील मारवाड, खेतिया, करणपूर, निमाड, बडवाणी, सेंधवा या भागात मोठया प्रमाणात आढळून येतो. वरील पुस्तकांत लेखकाने आदिवासींचा इतिहास, कुटंबसंस्था, आप्तसंबंध व्यवस्था, पावराकुल, विवाहसंस्था, धार्मिक व सांस्कृतिक जीवन ,मुल्ये, श्रध्दा, आचार विचार, सण उत्सव, पावरांची अर्थिक क्रिया, शैक्षणिक परिस्थिती, आदिवासी विकासासाठी शासकीय योजना यांचा सर्वांगीण दृष्टीकोनातून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी पावरा समाजाच्या सामाजिक जीवनाच्या महत्वपूर्ण अंगाचे विवरण लेखकाने करून सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना, प्रशासकांना, आदिवासी समाजाच्या संशोधनाचा मार्ग मोकळा करून दिला आहे.

मेश्राम गोकुळदास – ***आदिवासी सिंधु संस्कृतीचे वारसदार व त्यांचा धम्म*** ,सुगावा प्रकाशन , पुणे, आवृत्ती – 1, ऑक्टो– 2006 (ISBN -81-88764-60-4)

सिंधुसंस्कृतीत आदिवासींच्या संपूर्ण जीवनाचे दर्शन लेखकाने या पुस्तकामध्ये केले आहे., द्रविड व आर्य लोक यांच्यातील विविध अंगाची चर्चा या पुस्तकात आहे. आदिवासी जमाती, जातींचे विवेचन करून लेखकाने त्यांचे संपूर्ण सामाजिक जीवनाचे वर्गीकरण करून सर्वांगीण अंगाची चर्चा यात केली आहे. त्याचबरोबर त्यांनी सर्व भारतीय मूळ निवासी पुर्वी बौध्द धम्मीय होते हे त्यांनी सिध्द करून दाखविले आहे त्यामुळे संशोधनासाठी सदर पुस्तक उपयुक्त आहे.

कुलकर्णी शौनक – ***महाराष्ट्रातील आदिवासी***, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे , आवृत्ती– 1 , ऑक्टोबर 2009, (ISBN-978-81-8483-191-7)

प्रस्तुत पुस्तक मुख्यत्वे करून महाराष्ट्रातील आदिवासी समाजाशी संबंधीत असल्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमातींचा परिचय यांत करून दिला आहे. त्याचबरोबर आदिवासी जमाती पोशाख, अन्न,उपजिविका, वैवाहिक रितीरिवाज, अत्यंसंस्कारपध्दती, देवदेवता,पुजाअर्चा, जादूविद्या व भगत या सर्वांचा परिचय लेखकाने या पुस्तकात संदर्भासहित व चित्रासहित दाखविला आहे. त्यामुळे संशोधकांना आदिवासींचे दैनंदिन जीवन कसे असते याची पायाभुत जाणीव कळते. आदिवासी आणि पर्यावरण यांचा जवळचा संबंध आहे कारण पर्यावरणाच्या सानिध्यात राहूनच प्रत्येक आदिवासी हा आपली प्रगती करू शकतो हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे हे देखील लेखकाने दाखविले आहे. त्याचबरोबर लेखकाने या पुस्तकांत आदिवासींच्या न्याय पंचायतीचे स्वरूप, न्यायप्रक्रीया, शिक्षा, भाषा, संस्कृती , कुलचिन्हे, धर्मपरिवर्तन, या सारख्या बाबींचा देखील शोध घेउन सत्य परिस्थिती जगासमोर मांडली आहे.

गाठाळ एस.एस. – ***भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन***, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, आवृत्ती–1, जुलै 2013, (ISBN-978-93-81161-72-9)

या ग्रंथात प्राचीन काळापासून ते थेट आजपर्यंतच्या भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांचा , कर्तृत्वाचा, दुखाःचा त्यामागील कारणांचा समग्र

स्वरूपांत वैचारिक आलेख लेखकाने घेतला आहे. हुंडाबळी, बलात्कार, स्त्री शिक्षण व आरोग्य यांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती, स्त्री स्वातंत्र्यावरील निर्बंध हे आज भारतीय स्त्रियांच्या पुढील प्रश्न आहेत व होते. या प्रश्नांची सर्व अंगाने उकल करण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथात केला आहे. त्याचबरोबर या ग्रंथात महिलांच्या परिषदा व संघटन, ब्रिटिशांचे महिलाविषयक धोरण व कायदे, स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे योगदान, स्त्रियांचे शिक्षण, समाजसुधारकांचे स्त्रीमुक्तीबद्दलचे चिंतन या विविध विषयाची चर्चा या पुस्तकात लेखकाने केली आहे.

भागवत विधुत – ***स्त्रियांचे मराठीतील निंबधलेखन, साहित्य अकादमी***, नवी दिल्ली, आवृत्ती, 1 ,
2013 . (ISBN-978-81-260-4156-5)

हे पुस्तक म्हणजे स्त्रियांच्या विकासाबाबत मराठीतील निंबधाचे संकलन आहे. सदर निंबंध हे स्त्रियांच्या विविध प्रश्नांची चर्चा करणारे आणि त्यांच्या समस्यांची उकल करणारे श्रेष्ठ दर्जाचे पुस्तक आहे. स्त्रियांच्या निंबधलेखनाच्या हया संकलनातून महाराष्ट्रातील स्त्रियांनी अगदी 1868 पासून ते 2012 पर्यंत जे दर्जेदार लिखाण झाले त्या लिखणाची सखेल चर्चा या पुस्तकात केली आहे. या पुस्तकाचा महत्वाचा उद्देश म्हणजे स्त्रियां या निबंधातुन आपले संघर्ष कसे मांडतात, त्यांचे संघर्ष कसे घडतात व त्या संघर्षातून जग कसे आकार घेते हे याचे स्पष्ट चित्रण होते. स्त्रियांनी प्रतिकाराच्या कोणत्या रिती निर्माण केल्या, स्त्रियांनी नियंत्रित करणारे कोणते प्रकल्प आहेत हया सर्व गोष्टी तटस्थपणे पाहण्याचा उद्देश हा या पुस्तकाचा आहे. प्रस्तुत पुस्तकात इतिहास निर्माण करणा–या स्त्रिया म्हणून फक्त अभिजन वर्गातील स्त्रियांकडेच पाहिले जावू नये तर दलित आदिवासी, कष्टकरी समुदायांतील स्त्रियांचे योगदान देखील समाजाने व सरकारने लक्षात घेतला पाहीजे हे इंगीत करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

कडू मोहिनी – ***भारतीय राजकारणातील स्त्रिया (चरित्रे – आत्मचरित्रे)***, विजय प्रकाशन, नागपूर,
आवृत्ती–1, जुलै 2008.

भारतीय राजकारणातील स्त्रिया हे पुस्तक म्हणजे राजकारणात कार्यरत असणा–या महिलांच्या चारित्रांचा वेध घेणारा संच आहे. ते स्त्रियांच्या राजकीय कार्याचे वाङःमयीन अंगाने केलेले मूल्यमापन आहे. हे मुल्यमापन वाङःमयीन अंगाने केलेले असल्यामुळे चरित्र आत्मचरित्राच्या क्षेत्रात नवीन अभ्यासाची समीक्षणाची असलेली नवीन तंत्रे कशी असतात हे या पुस्तकातून स्पष्ट होते. या पुस्तकात लेखिकेने स्वातंत्र्यसंग्रामातील महिलांचे नेतृत्व, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांचे चरित्र, राजकारणात कार्यरत असणा–या स्त्रिचे चरित्र, अनुवादीत चरित्रे – आत्मचरित्रे, अंशिक चरित्रे – आत्मचरित्रे सारखे विषय हाताळून काळाच्या ओघात नष्ट झालेले स्त्रियांचे कार्य पुन्हा उजेडात आणण्याचा प्रयत्न लेखिकेने या पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे हे विशेष.

गायकवाड दिपक – ***आदिवासी चळवळ स्वरूप व दिशा***, सुगावा प्रकाशन , पुणे, आवृत्ती–1,
ऑगस्ट – 2005, (ISBN-81-88764-26-4)

आपल्या मुलभूत हक्क व अधिकारासाठी व त्याच्या संरक्षणासाठी आदिवासींनी जी चळवळ उभी केली त्याचे पायाभूत विवेचनापासून तर आधुनिक काळातील आदिवासींची परिस्थिती या सर्व विषयाची सखोल चर्चा या पुस्तकांत लेखकाने केली आहे. आदिवासी चळवळीचा उगम, दिशा, सांस्कृतिक वाटचाल, शोषण व त्यावरील उपाय, आदिवासींचा धर्म , रामायण महाभारतातील नागवंश, जागतिक पातळीवर आदिवासींची स्थिती, आंबेडकरांचे आदिवासींसाठी योगदान, आदिवासी महात्मे, वीर, महापुरूष, याविषयी सविस्तर लिखाण या पुस्तकात केले आहे.

पवार वैशाली – ***महिलांच्या सत्ता संघर्शाचा आलेख***,डायमंड पब्लिकेशन्स,पुणे आवृत्ती –1, 2012. (ISBN-978-81-8483-475-8.)

उदारमतवादी राजकीय जीवनाच्या चौकटीत महिलांनी राजकीय जीवनात सत्ता संघर्ष करता यावा याचे वैज्ञानिक विश्लेषण लेखिकेने या पुस्तकामध्ये केले आहे 1962 पसून तर 2019 पर्यंत घडलेल्या राजकीय क्रिया, प्रक्रीया, निवडणुका , उमेदवारांचा सहभाग याचे विवेचन या पुस्तकात करण्यात आल्याने संशोधकाला हे पुस्तक म्हणजे संशोधनाची एक विशिष्ट दिशा दाखवणारी गुरूकिल्लीच होय. त्याचबरोबर सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, आणि जनाक्का शिंदे यांचा महिला मुक्तीचा विचार आणि सामाजिक वगळण्याची प्रक्रीया व राजकीय समावेशनाची प्रक्रीया यांचा संबंध या पुस्तकात जोडण्यात आल्याने या पुस्तकाचे महत्व आणखी जास्त वाढते. लोकसभा राज्यसभा यांत भारतीय महिलांचा सहभाग कमी का आहे निवडून आलेल्या महिलांमार्फत महिला हितसंबंधाचे राजकारण घडण्याऐवजी पितृसत्ताक हितसंबंधाचे राजकारण का घडत आहे अशा विविध प्रश्नाची उकल यांत असून महिलांना राजकीय क्षेत्रातून वगळण्याची प्रकीया किंवा त्यांचे समावेशन घडून येत नाही याची कारणमिमांसा देखील या पुस्तकात आहे.

भामरे ज. सर्जेराव – ***आदिवासींचे उठाव***, अपरांज पुणे, आवृत्ती – 1, जानेवारी 2015
(ISBN-978-81-927262-4-3)

आदिवासी वीरांनी आपल्या स्वांतत्रयासाठी व अस्तित्वासाठी सन 1818 जे 1868 पर्यंत जो संघर्ष केला त्यांचे सविस्तर व संदर्भावर आधारित विवेचन लेखकाने या पुस्तकामध्ये केला आहे. आदिवासींच्या पराक्रमाची, हौतात्म्याची जाण तरूणांना व्हावी व आजच्या तरूणांत चेतना निर्माण व्हावी व स्वतःची अस्मिता जागृत करून स्वाभिमान उंचावण्याचे व पुढील पिढिस प्रेरणा मिळावी हा मुख्य उद्देश या पुस्तकाचा आहे. विशेष म्हणजे लेखकाने या पुस्तकात इतिहासाचे लेखन करून तेथील क्षेत्राचा सामाजिक, अर्थिक, राजकीय, सांस्कृतिक उलगडा केला आहे. महाराष्ट्रात आदिवासी बांधवांनी जो लढा दिला त्याला इतिहासांत फारसे स्थान मिळाले नाही. ती देखील अस्सल साधनांचा उपयोग करून लेखकाने दाखवून दिली आहेत. त्यामुळे संदर्भग्रंथ म्हणून संशोधकांना याचा उपयोग होतो.

भागवत विघुत –***स्त्री प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने*** ,प्रतिमा प्रकाशन ,पुणे,आवृत्ती –2 प्रकाशन क्रं. 366, मार्च – 2004

लेखिकेने 1974 ते आजपर्यंत जे लेख लिहले आहे त्या सर्व लेखांचा एकत्रित संच म्हणजे हे पुस्तक होय. या पुस्तकात लेखिकेने लेखांची एकूण 5 विभागांत विभागणी केली आहे. आणि या पाचही विभागातून स्त्रीयांच्या प्रकट समस्या मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. तसेच स्त्रीयांच्या सर्वांगीण अंगाची चर्चा या पुस्तकात आहे. स्त्रियांच्या विकासासंबंधीचे वाद, कौटुंबिक व सामाजिक प्रश्न, चळवळी व राजकीय दृष्टीकोनातून निर्माण झालेले वाद यांची सखोल चर्चा लेखिकेने विविध लेखांच्या माध्यमातुन केली असून भारतीय स्त्री चळवळीचे भिन्न टप्पे या लेखातून अधोरेखित होत असल्याने भारतातील विशेषता महाराष्ट्रातील समकालीन स्त्री चळवळीला तळागाळापर्यंत पोहचविणा–यांना संशोधकांना पुस्तकरूपी सामग्री उपयोगांत ठरण्यासारखी आहे.

कर्वे स्वाती – ***स्त्रियांची शतपत्रे ( इ.स, 1850 ते इ.स, 1950)***, प्रतिमा प्रकाशन, पुणे ,
आवृत्ती–1, प्रकाशन क्र.. 357, ऑगस्ट 2009

इ.स. 1850 ते 1950 या कालखंडातील स्त्रियांच्या वैचारिक लेखांचे संपादन लेखिकेने या संग्रहासाठी केले आहे. स्त्री जीवनाचा सामाजिक इतिहास या पत्रातून साकार होत आहे. त्याचबरोबर व्यक्तिगत पत्रे, सामाजिक पत्रे, राजकीय पत्रे, सार्वजनिक कार्यांची पत्रे या पत्रांचे व्यवस्थित शास्त्रीय विवचन करून महिलांच्या अस्सल जीवनाचे खरे चित्र लेखिकेने या पुस्तकात मांडले आहे. त्यामुळे महिलांच्या चळवळी त्यांचे संघर्ष आणि त्यांच्या कार्यवृत्तीचे दर्शन या पत्रांच्या माध्यमातून होतांना दिसून येते.

कर्वे स्वाती –***स्त्री विकासाचे नवे क्षितीज***, प्रतिमा प्रकाशन,पुणे, प्रकाशन क्रं. 353,आवृत्ती – 1, मार्च 2008

स्त्री विकासावर आधारीत वैचारिक लेखांचा संग्रह म्हणजे स्त्री विकासाचे नवे क्षितीज हे पुस्तक होय. प्रस्तुत पुस्तकाच्या लिखाणाची विभागणी लेखिकेने सहा विभागात केली असून स्त्रीयांच्या सर्वांगीण अंगाचे दर्शन होईल असे लेख या पुस्तकात प्रकाशित करण्यात आले आहे. एकोनिसाव्या आणि विसाव्या शतकातील स्त्रियांच्या जीवनाचे दर्शन या पुस्तकात होत असल्यामुळे स्वातंत्र्यानंतरचा बदलता काळ, सामाजिक परिस्थिती, स्त्रीमुक्तीचे पर्व आणि या पार्श्वभूमीवर स्त्रियांचे बदलते जीवन व व्यक्तिमत्व, कर्तृत्व याची स्पष्टोक्त मांडणी या पुस्तकात असल्याने स्वातंत्र्योत्तर काळाचे आणि स्त्रीजीवनाचे प्रतिनिधिक चित्र या संग्रहातून साकार झाल्याचे सदर पुस्तकाच्या अध्ययनातून दिसून येते.

जंगले मंगला – ***महाराष्ट्राची अर्थव्यवस्था***, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, आवृत्ती –1 , 2013
(ISBN-978-93-82414-89-6)

या पुस्तकात लेखिकेने महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची अघयावत माहिती व अचूक आकडेवारी दिली आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयाची अर्थिक स्थिती, सामाजिक, कौटुंबिक स्थिती, शासनाची धोरणे, बजेट, अनुसूचित जातीजमातींची शासकीय धोरणे याचे विस्तृत विवेचन या पुस्तकामध्ये केले आहे. तसेच शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या आकडेवा–यांची अचूक तुलना, विश्लेषण आणि त्याचे निष्कर्ष या पुस्तकामध्ये व्यवस्थित मांडणी स्वरूपांत मांडली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या एकंदरीत सर्व बाबींचा अभ्यास करतांना सदर पुस्तक महत्वाचे ठरते.

भुसारी निळकंठ , पोच्छी वनिता, निकम मीना (संपादक) – ***प्रतिबिंब ( महिला समस्यांचा आत्मशोध)*** , अथर्व पब्लिकेशन्स धुळे, आवृत्ती–1, 2013 (ISBN-978-93-811171-99-8)

हे पुस्तक म्हणजे देशातील प्रतिष्ठीत अभ्यासकांनी महिला विकासाबाबत केलेले चिंतन होय. या पुस्तकात तज्ञ संशोधकांनी महिलांच्या समस्येचा शोध घेवून त्याच्या कारणमिमांसेचे वर्णन केले आहे. त्याचबरोबर शासनाला विकासाबाबत सूचना करून महिला विकासाचा मार्ग त्या माध्यमातून मोकळा केला आहे. या पुस्तकाचा महत्वाचा उद्देश म्हणजे महिलांवरील अत्याचाराचे निराकरण करणे, महिलांचा अर्थिक दर्जा सुधारणे, दलित आदिवासी स्त्रियांमध्ये मुलभूत हक्क व आधिकराबाबत जागृती निर्माण करून स्त्री संवेदनशील धोरणांना प्रोत्साहन देणे, प्रसार व प्रचार माध्यमाचा उपयोग करून व सामाजिक प्रबोधन करून जागृती करणे, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात

स्त्रियांचा सहभाग वाढविणे या बाबतच्या विविध विषयांचे चिंतन करून प्रबोधनाचा मार्ग मोकळा करण्याचा हेतु सदर पुस्तकात आहे.

मालशे मिलिंद , जोशी अशोक – ***आधुनिक समिक्षा सिध्दान्त*** – मौज प्रकाशन गृह प्रकाशन,
मुंबई, आवृत्ती – 1 प्रकाशन क्रं. 598, 2006. (ISBN-81-7486-659-0)

आधुनिक समिक्षा सिध्दांत हे पुस्तक संशोधन कार्यकरणाच्या संशोधकांसाठी संशोधनाची दिशा दाखवणारे मार्गदर्शक पुस्तक आहे. समिक्षा म्हणजे काय आणि तटस्थपणे एखादया प्रकरणाची , पुस्तकाची , विषयाची समिक्षा कशी केली जाते हे लेखकाने या पुस्तकामध्ये पध्दतशीरपणे मांडले आहे. आज विविध संकल्पनाच्या व तत्वांच्या आधारे विविध प्रकारचे नवे सिध्दांत उदयास आले या नव्या सिध्दांताचे स्वरूप आणि संदर्भ समजवून घेणे व त्याची चिकित्सा करणे हा या ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे. या ग्रंथात सौंदर्यशास्त्र सारख्या विषयाची चर्चा केली असून जीवनवाद व स्वायत्ततावाद या दोन तत्वाचा विचार करून संकल्पना व त्याची बहुविधता, ऐतिहासिक व राजकीय स्वरूप या विषयाची सखोल चर्चा केल्याने बौध्दिक चळवळीला चालना देणारे महत्वपूर्ण पुस्तक ठरते. मार्क्सवाद व त्याचे मनोविश्लेषण यात असून , आस्वाद, विश्लेषण, आधुनिकतावाद , उत्तर आधुनिकतावाद, उत्तर संरचनावाद , स्त्रीवाद , उत्तर स्त्रीवाद या संबंधीची सांस्कृतिक चिकित्सा यांत आहे.

भुसारी निळकंठ, मालटे गणेश, जाधव जे.ज. (संपादक) – ***मानव अधिकार ( विस्थापितांच्या व पर्यावरणाच्या समस्या)*** – अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, आवृत्ती –1 ,2012
(ISBN-978-93-81171-62-2)

मानवाधिकाराची सखोल चर्चा करणारे व विस्थापितांच्या व पर्यावरणाच्या जागृतीबाबत प्रबोधन करणारे हे पुस्तक आहे. पुस्तकाचा गाभा अदिवासी दलित समाजातील स्त्री–पुरूषावर होणा–या अन्यायाला वाचा फोडणारा आहे.

आधुनिक प्रगतीमुळे विविध तंत्राचा व प्रकल्पांचा , उद्योंगाचा विविध समस्यांचा मोठा विकास भारतात घडून आला. पंचवार्षिक योजनांमध्ये विविध प्रकल्पावर लाखो करोडो रूपये खर्च करण्यात आले आणि विकास साधण्यात आला. परंतु प्रकल्पांच्या निर्मितीमुळे अनेक समस्या मोठया प्रमाणात वाढल्या. आदिवासींचे घरे, शेती प्रकल्पनात अडकली, अनेक खेडयांच्या विस्थापनेचा प्रश्न उभा झाला त्यामुळे अज्ञान, दारिद्रय, गरिबी मोठया प्रमाणात वाढली या सर्वांवर उपाय सुचविणारा महत्वपूर्ण ग्रंथ म्हणजे मानवाधिकार होय. या पुस्तकातील विविध मान्यवरांच्या शोधनिंबंधातुन सरकारला विस्थापितांच्या समस्या व त्यातुन निर्माण झालेले पर्यावरणाचे प्रश्न कसे सोडविता येईल याची दिशा दाखविणारा हा ग्रंथ आहे.

## • *समारोप –*

वरील सर्व साहित्य महिलांचे सबलीकरण व राजकीय सामाजिकरण व्हायला पाहिजे या उदात्त विचाराने प्रेरित होवून लिहलेली आहे. या साहित्यातुन महिलांमध्ये मुलभूत अधिकार व हक्कांची जाणीव तर होतेच त्याचबरोबर आधुनिक बदलत्या परिवेशात सक्षमपणे समोर जाण्याचे पाठबळ या साहित्यातूनच प्राप्त होतांना दिसून येते म्हणून महिलांवर प्रकाशित झालेले हे साहित्य संशोधनाचा खुप मोठा आधार होउन नवी विकासात्मक मुल्यांची निर्मिती करण्यात महत्वाची भूमिका बजावेल हे सुर्यप्रकाशाइतके स्वच्छ आणि सत्य आहे

## *संदर्भ –*

1.मालशे मिलिंद, जोशी अशोक – आधुनिक समीक्षा सिध्दांत, मौज प्रकाशन गृह. मुंबई, प्रथम आवृत्ती, 2007, पान नं.3
2.ढगे एस.के. , हासे. सी.पी. – संशोधन पध्दती के.एम. पब्लिकेशन्स, पुणे. आवृत्ती–2 , जुलै 2014 , पान न. 359
3.क–हाडे बी.एम –. शास्त्रीय संशोधन पध्दती, पिपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रकाशन क्रं. 295, आवृत्ती–1, जानेवारी 2006, पान नं. 3

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org